दै आनंद नगरी ① १५/९

# विक्रमी मतदानासाठी सर्वांनी सहकार्य करावे - आयुक्त देशमुख

**नांदेड (प्रतिनिधी)** - महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत शहरातील मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी महापालिकेने प्राचार्य आणि मुख्याध्यापकांच्या बैठकीचे आयोजन दि. १४ रोज गुरूवारी शंकरराव चव्हाण सभागृहात करण्यात आले होते. यावेळी आयुक्त गणेश देशमुख बोलत असताना म्हणाले की, सर्वांनी विक्रमी मतदान करण्यांसाठी सहकार्य करावे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

११ ऑक्टोबर रोजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार होणार आहे. यासाठी शहरातील मतदारांत जनजागृती करण्यासाठी शाळा, महाविद्यालयातून मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा दि. १५, २०, २५ सप्टेंबर व १, ५, १० ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार असल्याचे सांगितले. लोकशाहीत मतदानाचे महत्व या विषयावर निबंध स्पर्धा, मतदानाचा अधिकार, मतदानाचे महत्व या विषयावर



चित्रकला स्पर्धा आयोजित करण्याच्या सुचना या बैठकीत देण्यात आल्या. तसेच महापालिका स्तरावर २९ सप्टेंबर रोजी शहरातील विसावा उद्यान परिसरात रांगोळी स्पर्धा आयोजित केल्याचेही सांगितले. या स्पर्धेतून प्रथम, द्वितीय व तृतीय स्पर्धेकांना मनपातर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

नांदेड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये विक्रमी मतदान होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे व मतदान करून घेण्यासाठी सक्रीय सहभाग नोंदवावा यासाठी महापालिकेकडून मतदारांना आवाहन करण्यासाठी प्रसिद्धीपत्रक; बॅनर तयार करण्यात येणार आहेत. याचबरोबर विद्यार्थ्यांनाही , प्रसिद्धीपत्रक देऊन त्यांच्या पालकांपर्यंत पोहचविण्याचे केले जाणार आहे. याचबरोबर मतदानात सहभाग नोंदविण्यासाठी ८०००६४४०१८ या ट्रोल फि क्रमांकावर पालकांनी मिस्ड कॉल द्यावा असेही आवाहन मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.

दे. प्रभात (2) 1/1/9

# चुनाव आचार संहिता का सख्ती से पालन हो

## राज्य चुनाव आयुक्त जेएस सहारिया ने दिए निर्देश

नांदेड:(संवाददाता) जिले की १७१ ग्राम पंचायतों एवं नांदेड वाघाला शहर महानगर पालिका के चुनाव के दौरान आचार संहिता का उल्लंघन करने वालों के खिलाफ कडी कार्वाई करने तथा मतदाताओ को रूपए व अन्य प्रकारों से लुभाने वालो पर अंकुश लगाने के लिए प्रशासन को तैयार रहने के निर्देश राज्य चुनाव आयुक्त जेएस सहारिया ने दिए. जिलाधिकारी कार्यालय के डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृह में ग्राम पंचायत व मनपा चुनाव के मद्देनजर बैठक आयोजित की गई. बैठक को संबोधित करते हुए राज्य चुनाव आयुक्त जेएस सहारिया ने कहा कि चुनाव कार्यक्रम घोषित होने के साथ ही आचार संहिता लागू हो गई है. निर्वाचन अधिकारियों को चुनाव के दौरान कानून-व्यवस्था का जायजा लेने के साथ मतदाताओ को रूपए व अन्य प्रकारों से लुभाने वालों पर कडी नजर रखने की जरूरत है. दिव्यांग मतदाताओ को मतदान के लिए व्हीलचेयर व रैम्प की व्यवस्था करने, मतदान केंद्र में सभी जरूरी सुविधाएं उपलब्ध कराने की जिम्मेदारी चुनाव विभाग की. है. इस ओर विशेष ध्यान देना जरूरी है. राज्य चुनाव आयोग के सचिव शेखर चन्ने ने कहा कि निर्वाचन अधिकारीयों को मतदान जनजागृति के साथ मतदाताओ को वोटरस्लिप का वितरण करना होगा. नामांकन-पत्रों का ऑनलाइन पंजीयन किया जाएगा. इसके लिए सिंगल विंडो प्रणाली शुरू कर उम्मीदवारो की मदद करने के निर्देश दिए गए. बैठक में जिलाधिकारी अरूण डोंगरे, एसपी चंद्रकिशोर मीणा, जिप सीईओ अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त जिलाधिकारी संतोष पाटील, निवासी उप जिलाधिकारी जयराज कारभारी, उप जिला निर्वाचन अधिकारी अनुराधा ढालकरी सहित विभिन्न विभागों के अधिकारी मौजूद थे.

दे. श्रमिक दर्पण (3)

# निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी-राज्य निवडणूक आयुक्त सहारिया

### मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी

नांदेड :- ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणेसाठी निवडणूक आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे आदेश राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी आज येथे दिले.

नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृहात ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक संदर्भात आढावा बैठक राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मिना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी जयराज कारभारी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा, असा सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत. या निवडणुका संदर्भात आयोगाने दिलेल्या सूचना नुसार कार्यवाही करावी. निवडणूक संदर्भातील कामात निष्काळजीपणा व कुचराई करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल, असेही श्री. सहारिया यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्थेसंबधी आढावा घेताना वस्तू अथवा पैसाच्या स्वरुपातील प्रलोभनाला आळा घालणे, अवैध दारु वाहतुकीवर व वाटपावर नजर ठेवणे, असे सांगून श्री. सहारिया म्हणाले की मतदानाचे

प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात मतदार जागृती मोहिम हाती घ्यावी. थेट सरपंच पदासाठी पहिल्यांदा मतदान होत आहे. बहुसदस्यीय पद्धतीनुसार आवश्यक तेवढे मते देणे याबाबत देखील मतदार जागृती करण्यात यावी. दिव्यांग मतदारांना मतदान करता यावे यासाठी व्हीलचेअर, रॅमची व्यवस्था करणे, मतदान केंद्रे सर्व सुविधेने अद्यावत व अधुनिक असावेत. लोकसभा व

पान ४ वर...

## निवडणूक आचारसंहितेची...

विधानसभा निवडणुकीच्या पद्धतीनेच या निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यावर भर दिला पाहिजे, अशा सूचनाही श्री. सहारिया यांनी यावेळी दिल्या. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने म्हणाले की, निवडणुकीशी संबंधीत यंत्रणांनी अधिक सतर्क राहून निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडाव्यात. मतदार जागृती बरोबर मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करावे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरावयाचे असल्याने त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. सिंगल विंडो सिस्टीम सुरु करुन उमेदवारांना आवश्यक परवानगी देण्यात याव्यात. यासारख्या विविध सुचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी अरुण डोंगरे यांनी जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुका संदर्भातील माहिती देतांना मतदान केंद्रे निश्चित केले आहे, मतदान यंत्रेही पुरेसे आहेत, निवडणुकीसाठी अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अवैध मद्यविक्री व मद्यवाहतुकीस आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदान जनजागृती करण्यात येत आहे. ग्रामपंचायती निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन कटीबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले. तर मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुक संदर्भात माहिती दिली. पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मिना यांनी निवडणूक विषयी आपल्या विभागाची माहिती दिली. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सौ. अनुराधा ढालकरी यांनी प्रास्ताविक केले तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे यांनी आभार मानले. या बैठकीस ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महापालिकेचे निवडणुक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निरीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, राज्य उत्पादन शुल्क, बॅंक, आयकर विभाग, पोलीस, वस्तु व सेवाकर विभाग, महावितरण, आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यपाल ः

१/९

दै उ मराठवाडा (५)

## मतदार याद्या उपलब्ध

नांदेड (प्रतिनिधी) - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात राज्याचे निवडणूक आयुक्त ज.स. सहारिया हे नांदेडच्या दौऱ्यादरम्यान दिलेल्या निर्देशानुसार मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या (फोटोसह) या मुख्य निवडणूक कार्यालय, स्टेडियम परिसर नांदेड येथे उपलब्ध असून त्यासाठी प्रती पेज रू. १ प्रमाणे शुल्क आकारण्यात आलेला आहे. ज्यांना कोणाला मनपा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदार याद्या पाहिजे असतील त्यांनी सदर ठिकाणी संपर्क साधावा.

दै लोकमत (5)

## मतदान जनजागृतीसाठी ब्रॅन्ड अॅम्बेसेडर नियुक्त

### मयुरी देशमुख : बॅनरवर झळकणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : नांदेड : महापालिका निवडणुकीत मतदानांचे प्रमाण वाढावे यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान जनजागृती केली जाणार आहे. या जनजागृतीसाठी महापालिकेने 'खुलता कळी खुलेना' या मालिकेतील प्रमुख अभिनेत्री मयुरी भाकरे- देशमुख हिचे ब्रॅन्ड अॅम्बेसेडर म्हणून निवड केली आहे.

महापालिकेच्या जनजागृती कार्यक्रमात मयुरी भाकरे-देशमुख सहभागी होणार आहे. मनपाच्या जनजागृती बॅनरवर त्यांचे छायाचित्र राहतील. तसेच शहरात होणाऱ्या रोड शो मध्ये त्या सहभागी होणार आहेत. महापालिकेच्या वतीने शहरातील विविध महाविद्यालयात होणाऱ्या जनजागृती कार्यक्रमांना त्यांची उपस्थिती राहील.

दरम्यान, महापालिका निवडणूक अनुषंगाने महापालिकेत गुरूवारी राजकीय पक्षांचीही बैठक झाली. या बैठकीत ऑनलाईन उमेदवारी, दैनंदिन खर्च सादर करणे, बँक व्यवहार, आचारसंहिता पालन, प्रचारादरम्यान देण्यात येणाऱ्या विविध परवानगीबाबत इच्छुकांना माहिती देण्यात आली. यावेळी विविध पक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

दै सकाळ (6)

## मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार

**नांदेड दि. १४ (प्रतिनिधी)**– महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत शहरातील मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी महापालिकेने प्राचार्य आणि मुख्याध्यापकांच्या बैठकीचे आयोजन आज गुरूवारी शंकरराव चव्हाण सभागृहात करण्यात आले होते. यावेळी आयुक्त गणेश देशमुख म्हणाले की, सर्वांनी विक्रमी मतदान करण्यासाठी सहकार्य करावे असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

११ ऑक्टोबर रोजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार होणार आहे. यासाठी शहरातील मतदारांत जनजागृती करण्यासाठी शाळा, महाविद्यालयातून मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा दि. १५, २०, २५ सप्टेंबर व १, ५, १० ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार असल्याचे सांगितले. लोकशाहीत मतदानाचे महत्व या विषयावर निबंध स्पर्धा, मतदानाचा अधिकार, मतदानाचे महत्व या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्याच्या सुचना या बैठकीत देण्यात आल्या.

तसेच महापालिका स्तरावर २९ सप्टेंबर रोजी शहरातील विसावा उद्यान परिसरात रांगोळी स्पर्धा आयोजित केल्याचेही सांगितले. या स्पर्धेतून प्रथम, द्वितीय व तृतीय स्पर्धेकांना मनपातर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

नांदेड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये विक्रमी मतदान होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे व मतदान करून घेण्यासाठी सक्रीय सहभाग नोंदवावा यासाठी महापालिकेकडून मतदारांना आवाहन करण्यासाठी प्रसिद्धीपत्रक, बॅनर तयार करण्यात येणार आहेत.

याचबरोबर विद्यार्थ्यांनाही प्रसिद्धीपत्रक देऊन त्यांच्या पालकांपर्यंत पोहचविण्याचे केले जाणार आहे. याचबरोबर मतदानात सहभाग नोंदविण्यासाठी ८०००६४४०१८ या टोल फ्रि क्रमांकावर पालकांनी मिस• कॉल द्यावा असेही आवाहन मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.